# मिरा भाईंदर महानगरपालिका

## // प्रेस नोट //

दि.07/01/2025

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील सार्वजनिक शौचालय, खाजगी गृहसंकुले/ सोसायटी/ व्यापारी संकुले/ शैक्षिणक संकुलनातील सेप्टीक टँक / मलप्रक्रिया केंद्र/ मलवाहीनी इत्यादी साफसफाई करणेसाठी मार्गदर्शक सुचना प्रसिध्द करण्यात आली आहे. शहरातील इमारती/ गृहसंकले/ व्यवसायीक आस्थापना ज्या ठिकाणी मलनिसारण वाहीनी नाहीत. त्या ठिकाणी सेप्टीक टँक सफाई करीता महानगरपालिकेद्वारे सांडपाणी वाहुन नेणेकरीता महानगरपालिका मालकीच्या मैलावाहु वाहनामार्फत सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प पर्यंत वाहतुक करणेकामी अद्यावत वाहने उपलब्ध करून दिलेली आहेत व रितसर प्रक्रियेचा अवलंब करून या वाहनांमार्फत सेप्टीक टँक साफसफाई करणे आवश्यक आहे.

हाताने मैला उचलणाऱ्या सफाई कामगारांच्या नियुक्तीस प्रतिबंध करणे व त्यांचे पुनर्वसन करणे अधिनियम 2013 कायदा (मॅन्युयल स्कॅव्हेंजर ॲक्ट 2013) केंद्र शासनाने पारित केला असुन सदर कायदा 2013 पासुन लागु करण्यात आलेला आहे. सदर कायद्यानुसार मनुष्यबळाचा वापर करून हाताने मैला उचलणे गुन्हा आहे. तसेच शासनाने याबाबत कार्यपध्दती निश्चित केली असून त्यास प्रसिध्दी दिली आहे. तसेच मिरा भाईंदर महानगरपालिकेने देखील याबाबत वेळोवेळी प्रसिध्दी दिलेली असुन जनजागृती केलेली आहे. व यांत्रिक वाहनांचा वापर करणेबाबत सुचना केलेल्या आहेत.

मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रात भाईंदर पुर्व, गोल्डन नेस्ट येथे नक्षत्र टॉवर कॉ.ऑ. हौ. सोसायटी या नावाने इमारत आहे. सदर सोसायटीद्वारे सेप्टीक टँक साफसफाई करणेसाठी महानगरपालिकेकडून कोणतीही रितसर परवानगी अथवा पुर्व सुचना न देता महानगरपालिकेच्या मैलावाहु यांत्रिक वाहनांचा वापर न करता परस्पर खाजगी व्यक्तीद्वारे सेप्टीक टँक साफसफाई करणेचा प्रयत्न करण्यात आला व त्यामध्ये एक व्यक्तीचा मृत्यु व एक व्यक्ती गंभीर जखमी असल्याबाबतची बातमी दि.07/01/2025 रोजीच्या वृत्तपत्रात प्रसिध्द झाली आहे. सदरचे कृत्य हे नियमास धरुन नसुन मॅन्युअल स्कॅव्हेंजर ॲक्ट 2013 नुसार गुन्हा पात्र आहे. सदर बाबत संबधित स्वच्छता निरीक्षक यांच्यामार्फत पंचनामा करुन अहवाल याकार्यालयात सादर करण्यात आला आहे. सदर इमारतीचे पदाधिकारी यांचेवर भारतीय दंड संहिता कलम 304, 34 व मॅन्युअल स्कॅव्हेंजर ॲक्ट 2013 या कायाद्यानुसार गुन्हा दाखल करणे आवश्यक असल्याने वरीलप्रमाणे गुन्हा दाखल करणेबाबत संबधित स्वच्छता निरिक्षक यांना प्राधिकृत करण्यात आले आहे.

तसेच सोसायटी पदाधिकारी यांनी केलेल्या बेकायदेशीर कृत्याबद्दल त्यांना नोटीस देण्यात आलेली असुन उक्त काम करताना दुर्घटना होऊन कामगाराचा मृत्यु झालेल्या कुटुंबियांच्या वारसास तातडीने मॅन्युअल स्कॅव्हेंजर ॲक्ट 2013 नुसार देय होत असलेली आर्थिक मदत व त्यांचे वारसांचे पुनर्वसन करणेबाबत संबधितास नोटीस बजाविण्यात आली आहे. व खुलासा सादर करणेबाबत कळविण्यात आलेले आहे.

07/01/25

(डॉ. सचिन बांगर)
उपायुक्त (घ.व्य.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

Scanned with OKEN Scanner